लोकमत शनिवार, दि. १८ ऑगस्ट २०१२



# एक लाख झाडे लावण्याच्या ठक्करर्सच्या मोहिमेचा शुभारंभ

नाशिक। दि. १७ (प्रतिनिधी)

स्थावर मालमत्ता विकसन क्षेत्रात ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या 'ठक्कर्स' समूहाने आपला सुवर्णमहोत्सव काल स्वांतत्र्यदिनाच्या मुहूर्तावर आगळ्या वेगळ्या स्वरूपात आपल्या सर्व साईट्सवर एक लाख झाडे लावण्याच्या 'हरित नाशिक' या मोहिमेचा शुभारंभ करून साजरा केला.

त्र्यंबकरोड वरील ठक्कर्स इस्टेटच्या प्रांगणात ठक्कर्स समूहातील कर्मचाऱ्यांनी सपत्निक केलेल्या वृक्ष पूजेने लाखात देखणी अशी ही मोहीम सुरू करण्यात आली. समूहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी पुढील एक वर्ष हे 'सुवर्णमहोत्सवी आनंद सोहळा वर्ष' म्हणून साजरा करण्याचा तसेच त्या आनंदोत्सव सोहळ्याचे पहिले पाऊल म्हणून यावर्षी एक लाख झाडे लावण्याचा मनोदय जाहीर केला. ठक्कर्स समूहाचे आतापर्यंत ४२,००० ग्राहक झाले असून, या ग्राहकांच्या कुटुंबातील सदस्यांचा सहभागातून ही मोहीम राबवणार असल्याचे ठक्कर यांनी सांगितले. याप्रसंगी वनाधिपती विनायकदादा पाटील यांनी कोणते झाड कोठे लावावे याचा पूर्ण विचार करूनच वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. झाड मोठे झाल्यानंतर वाढीसाठी पुरेशी जागा नसल्यामुळे ते जर तोडावे लागणार असेल तर अशा ठिकाणी वृक्ष लावू नयेत. हे सांगताना नाशिककडून नाशिकरोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर ब्रिटिशांनी लावलेल्या वडाच्या झाडांचे उदाहरण त्यांनी दिले. यावेळी ठक्कर कुटुंबीयांनी पाहुण्यांना तुळशीचे रोप भेट म्हणून दिले. प्रमुख पाहुणे म्हणून क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष किरण चव्हाण, आमदार वसंत गिते, माजी खासदार देवीदास पिंगळे, नगरसेवक अशोक मुर्तडक, विकासक नेमीचंद पोद्दार, ॲड. एस. एल. देशपांडे तसेच डॉ. काकतकर आदि उपस्थित होते.